समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे

-----------------------------------------------------------------------

**दि. २९/१२/२०१६**

## वक्तृत्व व निबंध स्पर्धा अहवाल

**वक्तृत्व स्पर्धा - स्वातंत्र्य, न्याय, समता आणि बंधुता**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा** अंतर्गत **समाज कल्याण कार्यालय, धुळे** आणि **समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे** यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयत ग्रंथालयमार्फत वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धेचे अयोजन दिनांक २९/१२/२०१६ रोजी ठिक सकाळी ११:०० वाजता करण्यात आले होते.

वक्तृत्व स्पर्धेच्या कर्यक्रमाच्या सुरुवातीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, धुळे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गोपाळ निंबाळकर होते. कार्यक्रमात वक्तृत्व स्पर्धेचे सुत्रसंचालन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणुन महाविद्यालयातील प्रा.डॉ. रघुनाथ महाजन आणि प्रा.फरिदा खान यांनी उपस्थित राहुन वक्तृत्व स्पर्धेचे कामकाज पाहिले.

वक्तृत्व स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट वक्तृत्व सादर केले. त्यापैकी प्रथम क्रमांक खांडेकर पुंडलिक जयदेव, व्दितीय क्रमांक भोई दिनेश साहेबराव व तृतीय क्रमांक भामरे कल्पेश अमृत यांनी यश मिळविले. त्यांना समाजकल्याण विभागामार्फत प्रथम क्रंमांक मिळविणाऱ्यास १०००/- रु. रोख व प्रमाणपत्र तसेच व्दितीय क्रमांकास ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र व तृतीय क्रमांकाला ५०१/- रोख व प्रमाणपत्र बक्षिस देण्यात येणार आहे. अशा पध्दतीने वक्तृत्व स्पर्धा पार पडली.

**निबंध स्पर्धा:- आंतर जातीय विवाह एकजुट समाजाचा पाया**

त्याचप्रमाणे सदर महाविद्यालयात दु. ठिक १:०० वाजता आंतर जातीय विवाह एकजुट समाजाचा पाया या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील तसेच वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता सदरील स्पर्धेचे कामकाज ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी पार पाडले.

मा. प्रा.गोपाळ निंबाळकरांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आले. निबंध स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये **प्रथम क्रमांक कु. कचवे ललिता रावसाहेब, व्दितीय क्रमांक अमीर झारी व तृतीय क्रमांक पेटकर जागृती मनिष** या विद्यार्थ्यांना **मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, धुळे** यांच्यामार्फत **प्रथम क्रमांक** मिळविणाऱ्यास **१०००/- रु. रोख व प्रमाणपत्र** तसेच **व्दितीय क्रमांकास ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र** व **तृतीय क्रमांकाला ५०१/- रोख व प्रमाणपत्र** बक्षिस देण्यात येणार आहे.

अशाप्रकारे सदरील वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले तसेच ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी दोन्ही उपक्रमांचे आयोजन केले होते. सर्व उपस्थित  मान्यवर व विद्यार्थी यांचे श्री. विजय आगळे यांनी आभार मानले. अशा प्रकारे दोन्ही उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे

---

**ग्रंथालय प्रशिक्षण कार्यशाळा** **दि. ८/१२/२०१६**

## अहवाल

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा** अंतर्गत **समाज कल्याण कार्यालय, धुळे** आणि **समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे** यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकल्याण कार्यालय, धुळे अंतर्गत असलेले शासकीय वसतिगृहातील कर्मचाऱ्यांसाठी **"एक दिवशीय ग्रंथालय प्रशिक्षण कार्यशाळा"** दिनांक ८/१२/२०१६ रोजी घेण्यात आली.

**प्रमुख मार्गदर्शक :- ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव**

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर अध्यक्षस्थानी होते, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्रीमती. वैशाली हिंगे, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण धुळे तसेच कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव होते. सदरील कार्यशाळेला श्रीमती. बागुल मॅडम समाजकल्याण निरिक्षक, धुळ, वसतिगृहातील कर्मचारी व ग्रंथालय कर्मचारी आदी उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमात सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचे स्वागत करुन प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी आपल्या पीपीटी (पेपर सादरीकरण) मार्गदर्शनातुन प्रशिक्षणार्थींना सुरुवातीला महाविद्यालयाची माहिती दिली. नंतर प्रत्यक्ष विषयाला अनुसरून पीपीटीच्या माध्यमातुन ग्रंथालयाची माहिती दिली. त्यात ग्रंथालयाची शिस्त, ग्रंथालयाची पंच सुत्रे, ग्रंथालयाचे प्रकार, ग्रंथालयाचा वापर, ग्रंथालयातील पुस्तकांच्या नोंदी, ग्रंथालयातील पुस्तकांची देवाण घेवाण, ग्रंथालयातील विविध रजिस्टर बनविणे व हाताळणे, ग्रंथालयातील विविध पध्दतींचा वापराबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी Google, Digital Libraries, Reference Services, E-Books, E-Resources तसेच इंटरनेट च्या माध्यमातुन उपलब्ध असलेले Free National & International Journals याबद्दल ही माहिती दिली. तसेच N-List काय आहे? तर National Library and

Information Services Infrastructure for Scholarly Content म्हणजेच वाचकांकरीता ज्ञानसंग्रह त्याचा वापर कसा करावा? याबाबत मार्गदर्शन केले.

पीपीटी च्या मार्गदर्शनानंतर सर्व प्रशिक्षणार्थीनी प्रत्यक्ष ग्रंथालयात भेट देऊन ग्रंथालयातील सर्व रेकॉर्ड विषयी माहिती व रजिस्टर दाखविण्यात आली. त्यात प्रशिक्षणार्थींना ग्रंथालयातील पुस्तकांचे मुख्य नोंद रजिस्टर, मासिके-साप्ताहिके नोंद रजिस्टर, वर्तमानपत्र नोंद रजिस्टर, पेपर कात्रण फाईल, विद्यार्थी सभासद कार्ड, तालिका कार्ड, नियतकालिक आशय नोंद रजिस्टर, बी.एस.डब्ल्यू/एम.एस.डब्ल्यू. लघुशोध प्रबंध नोंद रजिस्टर, पुस्तकांची संगणकीय नोंद, पुस्तकांचे वर्गीकरण व तालीकीकरण, तसेच पुस्तकांची ग्रंथालयात रचना व मांडणी कशी केली जाते. याविषयी माहिती देण्यात आली व ग्रंथालयातील प्रत्यक्ष कामांची रजिस्टरही दाखविण्यात आली व सर्व प्रशिक्षणार्थींना ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव सरांनी संपुर्ण माहिती दिली.

त्यानंतर सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री. सुभाष बागुल यांनी केले. तर सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे, उद्‍घाटक, अध्यक्ष यांचे ग्रंथालयामार्फत आभार मानले तसेच प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित त्यांचेही आभार मानन्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालयाचे कर्मचारी श्रीमती.आम्रपाली सुर्यवंशी, श्री. विजय आगळे, श्री. विशाल भदाणे, श्री. सुभाष बागुल, श्री. मनोज ठाकरे, श्री. सुधीर पाटील यांचे सहकार्य लाभले.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे**

---

**(२०१६-१७)** **दि. २०/२/२०१७**

<u>वक्तृत्व व निबंध स्पर्धा निकाल</u>

**वक्तृत्व स्पर्धा - स्वातंत्र्य, न्याय, समता आणि बंधुता**

**प्रथम क्रमांक खांडेकर पुंडलिक जयदेव, १०००/- रु. रोख व प्रमाणपत्र**

**व्दितीय क्रमांक भोई दिनेश साहेबराव व ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र**

**तृतीय क्रमांक भामरे कल्पेश अमृत ५०१/- रोख व प्रमाणपत्र**

त्यांना समाजकल्याण विभागामार्फत प्रथम क्रंमांक मिळविणाऱ्यास १०००/- रु. रोख व प्रमाणपत्र तसेच व्दितीय क्रमांकास ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र व तृतीय क्रमांकाला ५०१/- रोख व प्रमाणपत्र बक्षिस देण्यात येणार आहे.

**निबंध स्पर्धा:- आंतर जातीय विवाह एकजुट समाजाचा पाया**

त्याचप्रमाणे सदर महाविद्यालयात दु. ठिक १:०० वाजता आंतर जातीय विवाह एकजुट समाजाचा पाया या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये

**प्रथम क्रमांक :- कु. कचवे ललिता रावसाहेब, १०००/- रु. रोख व प्रमाणपत्र**

**व्दितीय क्रमांक:- अमीर झारी ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र**

**तृतीय क्रमांक :- पेटकर जागृती मनिष ५०१/- रोख व प्रमाणपत्र**

या विद्यार्थ्यांना **मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, धुळे** यांच्यामार्फत **प्रथम क्रमांक** मिळविणाऱ्यास **१०००/- रु. रोख व प्रमाणपत्र** तसेच **व्दितीय क्रमांकास ७०१/- रु. रोख व प्रमाणपत्र** व **तृतीय क्रमांकाला ५०१/- रोख व प्रमाणपत्र** बक्षिस देण्यात येणार आहे.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**